अष्टक २

आप, तेज, वायू, संत सागरात । परब्रह्म ज्ञान, वैराग्य देहात ।
स्तब्ध जीवन, हाचि मुक्त संसाराशी । नमस्कार माझा गुरु चरणाशी ।।१।।

नमितो तुला मी, श्री नंगे बाबा । परब्रह्म ज्ञानी, वैराग्य उभा ।
तेजो माया तुझे, गुप्त हे स्वरूप । नमस्कार माझा, दर्शनी आकरूप ।।२।।

पृथ्वीचे तेज, वायू गगनासी । आप तेज ब्रह्म, अंतरी रूपासी ।
स्वरूपार्चि माया, दावितो जगाला । नमस्कार माझा नंगे बाबा तुजला ।।३।।

परब्रह्म ध्यानी, आंधळा तो राहे । निस्संग संग वृत्ति, स्वरूपासी होये ।
करितो विनंती, योगिया तुजला । नमस्कार माझा, गुरु चरणाला ।।४।।

हनुमंत चरणी, तप सर्व केले । परब्रह्म ध्यानी, जगाला लाविले ।
वैराग्य जीवन, दाविली ही कळा । नमस्कार माझा, नंगेबाबा तुजला ।।५।।

लक्ष चौऱ्यांशी, फिरुनिया आला । नांव नाही गाव सांगतो जगाला ।
परिपूर्ण माया संत सागरात । नमस्कार माझा गुरु चरणास ।।६।।

परशुराम नामे तनु ही जयाचि । गाडेमाळी कुळी धन्य योगियाची ।
करितो विनंती सदा मारुतीला । नमस्कार माझा नंगेबाबा तुजला ।।७।।

अखंड भक्ति पद हे पावन । दिन गुरुवार, गेला हा निघून ।
पंचतत्वे प्राण दिले वायू सुता । नमस्कार माझा श्री गुरु दत्ता ।।८।।

ब्रह्मा विष्णू महेश दाविली ही कळा । युगानुयुगी नांव, मच्छिंद्र आंधळा ।
विश्वनाथ बोले अष्टके तुझ्या चरणाशी । नमस्कार माझा नंगे बाबा तुजशी ।।९।।

भगवान नंगे बाबा की जय ।